**ठळक बातम्या**

- संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभारप्रस्तावावर चर्चा सुरु
- ३ नवे फौजदारी कायदे आजपासून देशभरात लागू
- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ४ जागांसाठीच्या निवडणुकीच्या मतमोजणीला प्रारंभ
- आंतरराष्ट्रीय आणि आशियाई स्तरावर पुरस्कार पटकावणाऱ्या खेळाडूंना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत या अधिवेशनकाळात शासन निर्णय आणण्याचं उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्र्यांचं विधानपरिषदेत आश्वासन

**आणि**

- टेनिस जगतातली प्रतिष्ठेची विंबल्डन स्पर्धा आजपासून रंगणार

**<><><><><>**

संसदेच्या दोन्ही सभागृहात राष्ट्रपती द्रौपती मुर्मू यांच्या अभिभाषणाबद्दल मांडण्यात आलेल्या आभारप्रस्तावावर चर्चेला सुरुवात झाली. भाजपा खासदार अनुराग सिंह ठाकुर यांनी केंद्र सरकारच्या गेल्या दहा वर्षांच्या लोककल्याणकारी योजनांचं आणि अर्थव्यवस्थेच्या विकासाचा उल्लेख केला. भाजपा सरकारच्या काळात २५ कोटी लोकसंख्या गरिबीतून वर आली, तसंच प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेच्या माध्यमातून ८० कोटी लोकांना मोफत  अन्नधान्य दिलं गेलं असं ते म्हणाले. संयुक्त पुरोगामी आघाडीच्या सरकारवर त्यांनी टीका केली.

तत्पूर्वी लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी 'नीट' परीक्षेतल्या कथित गैरप्रकारावर दिवसभराच्या चर्चेची  मागणी केली. त्यावर आभारप्रस्तावावर चर्चा सुरू असताना इतर कोणत्याही विषयावर चर्चा केली जात नाही, असं संरक्षण

मंत्री राजनाथ सिंह यांनी स्पष्ट केलं. आभारप्रस्तावरल्या चर्चेनंतर नीट परीक्षेच्या मुद्द्यावर चर्चा केली जाईल, असं आश्वासन सभापतींनी द्यावं अशी मागणी विरोधी पक्षांनी केली. मात्र, सभापतींनी ती नाकारल्यानं विरोधी पक्षांनी सभात्याग केला.

राज्यसभेतही राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर चर्चेला सुरुवात झाली. राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरल्या चर्चेत सहभाग घेतला. राष्ट्रपतींच्या अभिभाषणात राज्यघटना आणि लोकशाही समोरच्या आव्हानांचा तसंच दुर्बल घटकांच्या प्रश्नांचा उल्लेख असेल अशी अपेक्षा होती. परंतु आपली निराशा झाल्याचं मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले. या अभिभाषणात गरीब, दलित आणि अल्पसंख्यकांसाठी काहीही नसल्याचं खर्गे म्हणाले.

**<><><><><>**

केंद्र सरकार ईडी आणि सीबीआयचा गैरवापर करत असल्याचा आरोप करत विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीने आज संसदेच्या आवारात निदर्शनं केली. विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि इतर ज्येष्ठ नेते या निदर्शनांमध्ये सहभागी झाले होते. आम आदमी पक्षाच्या नेत्यांची तुरुंगातून सुटका करावी अशी मागणीही यावेळी विरोधकांनी केली.

**<><><><><>**

भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य अधिनियम हे तीन नवे फौजदारी कायदे आजपासून देशभरात लागू झाले. ब्रिटिशकालीन फौजदारी कायद्यांची जागा घेणारे हे कायदे संसदेने मागच्या वर्षी संमत केले होते. हे तीन नवे कायदे लागू करण्यापूर्वी सर्व राज्य सरकारं आणि केंद्रशासित प्रदेशांशी केंद्र सरकारनं अनेकदा चर्चा केली आहे. त्यामुळे देशभरातली राज्य सरकारं हे कायदे अंमलात आणण्यासाठी सज्ज आहेत.

या फौजदारी कायद्यांचा उद्देश शिक्षा देणं नसून न्याय देणं आहे, असं सरकारनं म्हटलं आहे. त्यामुळे विधायक परिणाम साधण्याच्या उद्देशाने अनेक वेगवेगळ्या उपायांची तरतूद या फौजदारी कायद्यांमधे केली आहे. अंमलबजावणीनंतर एफआयआर नोंदणीपासून न्यायालयाच्या निकालापर्यंत सर्व प्रक्रिया ऑनलाईन असणार आहे. त्यामुळे फौजदारी न्याय प्रणालीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या देशात भारताचा समावेश होणार आहे. या कायद्यांमुळे न्यायदानात होणाऱ्या विलंबाला चाप बसणार असून तीन वर्षांच्या आत न्याय मिळण्याचा मार्ग सुलभ होणार आहे.

नवीन कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी आणि जनजागृतीसाठी देशभरात विविध बैठका आणि मार्गदर्शनपर सत्रांचं आयोजन करण्यात येत आहे.

**<><><><><>**

लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी आज नवी दिल्लीत, लष्कर प्रमुख पदाचा कार्यभार स्वीकारला. जनरल द्विवेदी यांनी राष्ट्रीय युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून वीर योध्यांना आदरांजली वाहिली. भारतीय लष्कर कोणत्याही आव्हानाचा सामना करण्यासाठी सक्षम आणि सज्ज आहे, असंही ते म्हणाले. लष्कराच्या आधुनिकरणाचं महत्व अधोरेखित करत आत्मनिर्भरता मिळवण्यासाठी लष्कर स्वदेशी उपकरणं आणि प्रणालीच्या वापराला प्रोत्साहन देईल असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या ४ मतदारसंघातल्या निवडणुकीची मतमोजणी आज सकाळी सुरु झाली. कोकण पदवीधर, मुंबई पदवीधर आणि मुंबई शिक्षक मतदारसंघ या तीन मतदार संघांची मतमोजणी नवीमुंबईत नेरुळ इथं होत असून मतपत्रिकांची प्राथमिक मोजणी पूर्ण झाली आहे.

नाशिक शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची मतमोजणीही आज होत आहे. जळगाव जिल्ह्यातल्या चोपडा इथं मतमोजणी सुरू असताना एका मतदान केंद्रावर तीन मतपत्रिका जास्त निघाल्यानं गोंधळ उडाला. त्यामुळे संबंधित केंद्रावरची मतमोजणी स्थगित झाली आहे.

**<><><><><>**

अंतरराष्ट्रीय आणि आशियाई स्तरावर पुरस्कार पटकावणाऱ्या खेळाडूंना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत मंत्रिमंडळाने एक सर्वसमावेशक धोरण ठरवण्यात आलं असून योग्य प्रक्रिया पूर्ण करून या अधिवेशनात याबाबतचा शासन निर्णय आणला जाईल, अशी माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधानपरिषदेत दिली. आमदार प्रवीण दटके यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते.

२०१८ मध्ये आलेल्या दोन शासन निर्णयांद्वारे एकंदर ३३ खेळाडूंना थेट नियुक्ती देण्यात आल्याची माहिती पाटील यांनी दिली. या सर्व प्रक्रियेबद्दल तपशीलवार नियमावली तयार करण्यात आली असल्याचंही त्यांनी सांगितलं. या खेळाडूंना केंद्र आणि राज्य सरकारकडून देण्यात येणाऱ्या बक्षिसाच्या रकमेत कुठेही तफावत नसल्याचं स्पष्टीकरण पाटील यांनी दिलं. विविध वर्गांसाठी या खेळाडूंचा विचार करताना विचारात घेतल्या जाणाऱ्या निकषांचा उल्लेखही पाटील यांनी या प्रश्नाला उत्तर देताना केला.

टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने शनिवारी मिळवलेल्या जेतेपदाच्या पार्श्वभूमीवर, त्यांचं अभिनंदन करण्याचा ठराव मंजूर करून तो भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला पाठवण्याची सूचना आज विधान परिषदेत करण्यात आली. शिवाय, बीसीसीआयचे खजिनदार असलेले आमदार आशीष शेलार यांचा उल्लेख

या प्रस्तावात करण्याची मागणी प्रसाद लाड यांनी केली. त्यावरून विरोधकांनी सभागृहात गदारोळ करायला सुरुवात केली. गटनेते प्रवीण दरेकर आणि आमदार चंद्रकांत पाटील यांनी लाड यांना पाठिंबा दिला. उपसभापतींनी सभागृहात शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. मात्र, विरोधकांनी जागा सोडून समोर येत उपसभापतींच्या विरोधात घोषणाबाजी केली.

मुंबई ते मोरा फेरी बोटीवरच्या कामगारांची, आर्थिक मदत किंवा कर सवलतीची कोणतीही मागणी आमच्यापर्यंत आलेली नसल्याची माहिती संबंधित खात्याचे मंत्री संजय बनसोडे यांच्या वतीने उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. यावर विरोधी पक्षांनी पुन्हा गदारोळ आणि घोषणाबाजी करून सभात्याग केला. या प्रश्नाबाबत सहानुभूतीने विचार करून बैठक घेऊ, असं आश्वासन पाटील यांनी दिलं. या संघटना आणि त्यांच्या समस्या आणि मुद्द्यांची यादी दिल्यास निर्णय घेणं सोपं जाईल, असंही त्यांनी सांगितलं.

विविध परीक्षांमधल्या पेपरफुटीच्या निषेधात विरोधी पक्षांच्या आमदारांनी विधीमंडळ आवारामधे निदर्शनं केली.

**<><><><><>**

राष्ट्रीय चाचणी संस्थेने आज नीटच्या फेरपरीक्षेचे निकाल जाहीर केले आहेत. ५ मे रोजी झालेल्या परीक्षेत ग्रेस गुण मिळालेल्या १ हजार ५६३ विद्यार्थ्यांची फेर परीक्षा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार घेण्यात आली. एकूण ८१३ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. निकाल एनटीएच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**<><><><><>**

नीट युजी परीक्षेतल्या गैरप्रकारांसंदर्भात सीबीआयने गुजरातमधे एका खासगी शाळेच्या मालकाला अटक केली आहे. ५ मे रोजी झालेल्या नीट परीक्षेचं केंद्र या शाळेतही होतं. गुजरात पोलिसांनी यापूर्वी ५ जणांना अटक केली असून नीट परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी किमान २७ विद्यार्थ्यांकडून प्रत्येकी १० लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. सीबीआयने चौकशी हातात घेतल्यावर या अरोपींचा ताबा मागितला आहे.

**<><><><><>**

भारतीय तेल कंपन्यांनी विनाअनुदानित स्वयंपाकाच्या गॅसचे दर प्रति सिलेंडर ३० रुपयांनी कमी केले  आहेत. नवीन दर आजपासूनच लागू झाले असून, सुधारित दरांनुसार १९ किलोग्रॅमचा सिलेंडर दिल्लीत १ हजार ६४६ रुपयांना तर मुंबईत १ हजार ५९८ रुपयांना मिळतील. गेल्या महिन्यातही सिलेंडरच्या दरात ६९ रुपये ५० पैसे घट करण्यात आली होती.

**<><><><><>**

हिरवळीच्या कोर्टवर खेळल्या जाणाऱ्या जगातल्या प्रतिष्ठेच्या  विंबल्डन टेनिस स्पर्धेला आजपासून लंडनमध्ये सुरुवात झाली आहे. स्पर्धेच्या आजच्या पहिल्या दिवशी गतविजेता कार्लोस अल्कराजचा सामना एस्टोनियाच्या मार्क लाजेल याच्याबरोबर होणार आहे. भारतीय खेळाडू सुमित नागलचा पुरुष एकेरीचा पहिला सामना सर्बियाच्या मियोमिर केस्मानोविक याच्याबरोबर होणार आहे. पुरुष दुहेरीत रोहन बोपन्ना आणि त्याचा ऑस्ट्रेलियन साथीदार मॅथ्यू एब्डन यांचा सामना फ्रान्सच्या आद्रे मानारिनो आणि ज्योवां मेशी पेरिका या जोडी बरोबर होणार आहे.

भारताचे एन श्रीराम बालाजी आणि युकी भांबरी हे खेळाडूही स्पर्धेत भाग घेत आहेत.

**<><><><><>**

यवतमाळ नागपूर महामार्गावर चापरदा गावाजवळ झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातल्या चौघांचा मृत्यू झाला आहे. आज पहाटे ४ च्या सुमारास वेगवान इनोव्हा गाडी आणि  ट्रकवर धडकून हा भीषण अपघात झाला.

**<><><><><>**